**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@org.in Internet :http/www.dte.org.in


क्रमांक : १०/पदविका प्रवेश/२००९/२०८
दिनांक : १९/०६/२००९

## अधिसुचना

**शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांचे ऑनलाईन संगणकीकृत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसंदर्भात..**

महाराष्ट्र राज्यातील तंत्रनिकेतनामध्ये १० वी व १२ वी नंतरच्या अभियांत्रिकी, औषधनिर्माण, हॉटेल मॅनेजमेंट, सर्फेस कोटींग तंत्रज्ञान इ. पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रकीया ऑनलाईन संगणकीकृत केंद्रीभूत पध्दतीने या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येणार आहे. ऑनलाईन संगणकीकृत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये शासकीय, शासकीय अनुदानित व ज्या विनाअनुदानित संस्था केंद्रीभूत प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छितात अशा सर्व संस्थाचा अंतर्भाव असणार आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व विनाअनुदानित संस्थानां दि. २५/०६/२००९ रोजी पर्यंत इच्छा पत्र सादर करण्याचे आव्हान करण्यात आलेले आहे. ऑनलाईन संगणकीकृत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत लवकरच सविस्तर अधिसुचना जाहीर करण्यात येणार आहे. तेव्हा सर्व विद्यार्थी व पालक यांनी पदविका अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन संगणकीकृत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत संचालनालयाच्या वेळोवेळी प्रसिध्द होणा-या अधिसुचना पहाव्यात व या ऑनलाईन संगणकीकृत प्रवेश प्रक्रियेचा पुरेपूर लाभ घ्यावा.

तसेच ज्या विनाअनुदानित संस्थांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी व्हायचे आहेत अशा संस्था चालकानी रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र विहीत नमुन्यात दि.२५/०६/२००९ पर्यंत संबंधित तंत्रशिक्षण संचालनालय विभागीय कार्यालय येथे सादर करण्यासाठी आव्हान करण्यात येत आहे. कृपया विनाअनुदानित संस्थांनी इच्छा पत्र सादर करुन सहकार्य करावे.

(डॉ.सु.का.महाजन)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई

त्वरीत

जा.क्र./तंशीविकापु/प्रवि/२००९/६९५८ दि० 22 JUN 2009

प्रति
प्राचार्य
सर्व संलंग्नित संस्था (पुणे विभाग)
उपरोक्त अधिसुचनेची नोंद घेऊन आवश्यक/योग्य कार्यवाही करावी.

गोपंचोंधी
प्र-सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का.पुणे.

प्रत :- श्री शिंदे प्रोग्रॅमर सदर पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.